MHBI020014892026

१. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी मुंबई नियमन कायद्यानुसार वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यात असे म्हणले आहे की, अर्जदार हे मयत किसन रंगनाथ काळे यांचे वारस असुन त्यांचा मृत्यू दिनांक २८/०६/१९९३ रोजी झालेला आहे. अर्जदार हे त्यांचे वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, खाजगी व इतर कार्यालयीन कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांचे नावे मयत किसन रंगनाथ काळे यांचे वारस असलेबाबत वारस प्रमाणपत्र देण्याची विनंती अर्जदार करतात.

२. अभिलेखाची पडताळणी केली. अर्जदारांतर्फे ॲड. ए. एच. काळे यांचा युक्तिवाद ऐकला.

३. सदर अर्ज दाखल केल्यानंतर दिनांक २५/०६/२०२६ रोजी दैनिक 'राज्य लोकतंत्र' मध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द करुन अर्जावर हरकती मागविण्यात आल्या. मात्र मुदतीत कोणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदारांनी मयत किसन रंगनाथ काळे यांचे मृत्यू प्रमाणपत्र निशाणी ६ वर दाखल केलेले आहे. अर्जदारांच्या आधारकार्डच्या पडताळणी केलेल्या प्रती निशाणी क्र. ७ ते १० वर दाखल करण्यात आलेल्या आहेत. अर्जदार क्र. २ प्रल्हाद उर्फ प्रलाध किसनराव काळे यांनी निशाणी १६ वर त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असुन त्यात अर्जातील कथनांचा पुनरुच्चार केलेला आहे.

४. वरील सर्व बाबींचा विचार करता मी या निष्कर्षाप्रत पोहोचलो आहे की, अर्जदार क्र.१ ही मयत किसन रंगनाथ काळे यांची पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ ही मयताची मुले तर अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहित मुलगी

आहे. लेखी व तोंडी पुराव्यावरुन किसन रंगनाथ काळे हे मरण पावले आहेत व अर्जदार हे त्यांचे वारस आहेत असे दिसुन येते. त्यामुळे अर्जदार मागणी करतात त्याप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देणे उचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) अर्जदारांचे नावे परिशिष्ट ब मध्ये वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

३) अर्जदारांनी आवश्यक ते न्यायालयीन शुल्क भरावे.

४) वारसा प्रमाणपत्रावर दिवाणी नियमावली मधील प्रकरण १४ परिच्छेद ३१२ प्रमाणे टिप लिहीण्यात यावी.

५) सदर प्रमाणपत्र मालमत्तेवर कोणताही अधिकार देत नाही आणि कोणत्याही व्यक्तीचे निर्णायक हक्क निश्चित करत नाही किंवा त्यांना हानी पोहोचवत नाही.

Digitally signed by VIJAYKUMAR BAJARANG SALUNKE
Date: 2026.07.30 17:36:55 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA

दिनांक—३०.०७.२०२६

( व्ही.बी.साळुंके )
सह दिवाणी न्यायाधीश,
(क.स्तर) बीड.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Date of Order | : | 30/07/2026 |
| signed by presiding officer on | : | 30/07/2026 |
| Judgment uploaded on | : | 30/07/2026 |

Sd/-
R.M.Naik,
Stenographer Grade III